खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी “महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी” (अमृत) या नवीन स्वायत्त संस्थेची कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नोंदणीसाठी प्रथम संचालक व संस्थेचे पदसिध्द सदस्य यांच्या नियुक्तीस मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
इमाव, साशैमाप्र, विजाभज व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक : प्रसंस्था-२०१९/प्र.क्र.१००/महामंडळे
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ सप्टेंबर, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२/२/२०१९

२) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.प्रसंस्था २०१९/ प्र.क्र.१००/महामंडळे, दि.२२ ऑगस्ट, २०१९.

प्रस्तावना-

बार्टी,सारथी आणि महाज्योती या संस्थांच्या धर्तीवर खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील युवक- युवती व इतर उमेदवारांसाठी विविध उपक्रम, कार्यक्रम, इत्यादी राबविण्यात येवून व इतर माध्यमातूनही विद्यार्थी, युवक-युवती, इत्यादींचा विकास घडविण्यासाठी, महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी Academy of Maharashtra Research, upliftment and Training (AMRUT) (अमृत) या नावाने नवीन स्वायत्त संस्था स्थापन करण्यास उपरोक्त दिनांक २२ ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे व सदर संस्थेचे मुख्यालय पुणे येथे निश्चित करण्यात आले आहे. सदरहू संस्थेची नोंदणी कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नियम ८ अन्वये करण्यास उपरोक्त शासन निर्णया अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर “अमृत” संस्था स्थापन करणे व कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने वेळोवेळी आवश्यकते निर्णय घेण्याचे अधिकार मा. मंत्री (इमाव, साशैमाप्र, विजाभज व विमाप्र कल्याण) यांना प्रदान करण्यात आले आहेत.

वरील वाचा मधील क्र.२ येथील दिनांक २२ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णया नुसार Academy of Maharashtra Research, upliftment and Training (AMRUT) “अमृत” संस्थेची कंपनी कायदा, २०१३ कलम ८ अंतर्गत नोंदणीसाठी “प्रथम संचालक” आणि अमृत संस्था स्थापन करण्यासाठी शासनाचे प्रतिनिधी म्हणून प्रथम “सदस्य” आणि पदसिध्द सदस्य यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

शासन निर्णय-

वर प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी "महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी" Academy of Maharashtra Research, upliftment and Training (AMRUT) "अमृत" या संस्थेची कंपनी कायदा, २०१३ कलम ८ अंतर्गत नोंदणीसाठी "प्रथम संचालक" (First Directors) म्हणून खालील व्यक्तींची नियुक्ती करण्यात येत आहे.

अ.क्र.	**नाव**	**पदनाम**
१	डॉ. संजय कुटे, मा.मंत्री; इतर मागास वर्ग, सामजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई	अध्यक्ष, संचालक मंडळ
२	श्री. जे. पी. गुप्ता, प्रधान सचिव, इमाव, साशैमाप्र, विजाभज व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई	संचालक
३	श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, (कामगार), मंत्रालय, मुंबई	संचालक
४	श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई	संचालक
५	श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई	संचालक
६	श्री. डी.आर.परिहार, सेवानिवृत्त भा.व.से. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ४१२ १०५	संचालक

वरील पैकी उपलब्ध कोणत्याही तीन व्यक्तींची प्रथम संचालक (First Directors) म्हणून सदर अमृत या संस्थेची कंपनी कायदा २०१३ अंतर्गत कलम ८ अन्वये नोंदणी करून घेण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

२ सदर कंपनी शासनाच्या मालकीची असल्याने शासनाचे प्रतिनिधी म्हणून पुढील पदसिध्द सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

पदसिध्द सदस्य	
अ.क्र.	**पदनाम**
१	अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.
२	प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
३	प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन
४	प्रधान सचिव, इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, महाराष्ट्र शासन.
५	प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग).
६	प्रधान सचिव, उद्योग व कामगार विभाग (कामगार).
७	प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग (कृषी).
८	प्रधान सचिव, कौशल्य विकास विभाग व उद्योजकता विभाग

३. उपरोक्त परिच्छेद १ मध्ये नमुद केल्यानुसार प्रथम संचालक म्हणून नियुक्त व्यक्तींपैकी जे व्यक्ती प्रथम संचालक म्हणून सदर अमृत संस्थेची नोंदणी करणार, त्या व्यतिरिक्त व्यक्तींची संचालक म्हणून नियुक्ती बाबत अमृत या संस्थेच्या संचालक मंडळाच्या प्रथम बैठकीत उचित निर्णय घेण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९१९१८३८३७१७२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.09.19 18:45:00 +05'30'

(भा.र.गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री/राज्यमंत्री (इमाव, साशैमाप्र, विजाभज व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. सर्व सन्माननिय विधानसभा/विधान परिषद सदस्य

७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन सर्व विभाग
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई-१/नागपूर-२
९. महालेखापाल (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई-१/नागपूर-२
१०. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
११. श्री.राजेश कुमार, प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, (कामगार), मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊद्योग), मंत्रालय, मुंबई
१३. प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग (कृषी), मंत्रालय, मुंबई
१४. प्रधान सचिव, कौशल्य विकास विभाग व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. श्री. जे.पी.गुप्ता, प्रधान सचिव, इमाव, साशैमाप्र, विजाभज व विमाप्र कल्याण
१६. श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. श्री.दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. श्री. डी.आर.परिहार, सेवानिवृत्त भा.व.से. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ४१२ १०५
१९. व्यवस्थापकीय संचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
२०. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे
२१. आयुक्त, समाज कल्याण, पुणे
२२. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
२३. सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, इमाव, साशैमाप्र, विजाभज व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
२४. निवडनस्ती (महामंडळे).